दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

■आरएनआय : MAHMAR/2021/85884 — शनिवार, दि. २४ जानेवारी, २०२६ — ■ वर्ष - १ ■अंक - १२२■ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

नाती गोती रक्ताने जुळतात, पण विश्वासाने टिकतात. अहंकार आला की अंतर वाढते, संवाद आला की नातं वाचतं. आपुलकी जपली तरच नाती आधार बनतात आणि आयुष्य शांत, समृद्ध होते.

## कुख्यात रवी पुजारीला अटक

**मुंबई :** बॉलीवूड कोरिओग्राफर रेमो डिसूझा आणि त्याची पत्नी लिझेल डिसूझा यांच्याकडून खंडणी वसूल करण्याच्या आरोपाखाली गँगस्टर रवी पुजारीला अटक करण्यात आली आहे. आठ वर्षांपूर्वी २०१८ मध्ये या गँगस्टरने रेमो डिसूझा यांच्याकडून ५० लाख रुपयांची मागणी केली होती. पाच वर्षांपूर्वी सेनेगलमधून हद्दपार झाल्यापासून गँगस्टर रवी पुजारी तुरुंगात होता. मात्र, पुजारीला या प्रकरणात अटक करण्यात आली नव्हती. न्यायालयाने त्याला २७ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

## सारांश वृत्त

### अखलाक प्रकरणी ५ फेब्रुवारीला सुनावणी

**नोएडा :** गौतम बुद्ध नगर येथील न्यायालयाने शुक्रवारी २०१५ च्या लिंचिंग प्रकरणात मोहम्मद अखलाकच्या कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदवणे पुढे ढकलले आणि जलदगती न्यायालयाचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश रजेवर असल्याने पुढील सुनावणीची तारीख ५ फेब्रुवारी निश्चित केली. अखलाकच्या कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणारे वकील युसूफ सैफी म्हणाले की, अखलाकची पत्नी इकरामनसह इतर सर्वांचे जबाब शुक्रवारी नोंदवले जाणार होते परंतु न्यायाधीशांच्या अनुपस्थितीमुळे ते नोंदवता आले नाहीत.

### काँग्रेसचे राजीव गौडा यांचे निलंबन

**बेंगळुरू :** कर्नाटकातील काँग्रेसने शुक्रवारी पक्षाचे नेते राजीव गौडा यांना निलंबित केले, ज्यांनी शिदलघट्टा महानगरपालिका आयुक्त अमृता गौडा यांच्याबद्दल अपशब्द वापरले होते पक्षाने त्यांना २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत चिक्कबल्लापुरा जिल्ह्यातील शिदलघट्टा येथून उभे केले होते आणि त्यांचा पराभव झाला होता. अमृथाने तक्रार केल्यानंतर १४ जानेवारी रोजी त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला होता. अमृथाने आरोप केला होता की त्याने तिच्याशी गैरवर्तन केले आणि त्याचा फोटो असलेले बॅनर काढून टाकल्याबद्दल तिला फोनवर गंभीर परिणामांची धमकी दिली.

### नितीश कुमार यांच्या वसंत पंचमीच्या शुभेच्छा

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी शुक्रवारी सरस्वती पूजा सोहळ्यात भाग घेतला आणि वसंत पंचमीनिमित्त लोकांना शुभेच्छा दिल्या. कुमार यांच्यासोबत त्यांचा मुलगा निशांत कुमार आणि जद(यू) चे ज्येष्ठ नेते आणि बिहारचे मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह हे होते. कुमार यांनी राज्याच्या शांती आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली आणि वसंत पंचमीनिमित्त लोकांना शुभेच्छा दिल्या.

## उद्धवसेनेकडून शिंदेसेनेला भावनिक साद, भास्कर जाधव अग्रेसर

# मुंबईच्या महापौरपदासाठी दोन्ही सेना एकत्र?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** महापौर पदाच्या अरक्षणाची सोडत जाहिर झाल्यानंतर आता महापौरपदासाठी राजकीय खलबते सुरू झाले असून, मुंबई महानगर पालिकेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने एक मोठी राजकीय खेळी खेळली आहे. शिवसेना संस्थापक स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने भाजपऐवजी ठाकरे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा, असे आवाहन शिवसेना (यूबीटी) नेते भास्कर जाधव यांनी शुक्रवारी केले. हाच बाळासाहेबांना खरा मानाचा मुजरा ठरेल, अशी भावनिक सादही त्यांनी यावेळी घातली.

मुंबई महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. मात्र, भाजप (८९ जागा) आणि शिंदे यांची शिवसेना (२९ जागा) या महायुतीने ११४हा बहुमताचा आकडा पार केला आहे. दुसरीकडे, २५ वर्षे पालिकेवर एकहाती सत्ता गाजवणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला ६५ जागांवर समाधान मानावे लागले आहे. गुरुवारी काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीत मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या पार्श्वभूमीवर, भास्कर जाधव यांनी शिंदे गटासमोर ही अनपेक्षित मागणी ठेवली आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना भास्कर जाधव म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. ज्या मुंबई पालिकेवर बाळासाहेबांचे आयुष्यभर वर्चस्व राहिले, तिथे त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात शिवसेनेचा (ठाकरे गट) महापौर नसणे हे अत्यंत क्लेषदायक आहे. जे लोक स्वतःला बाळासाहेबांच्या विचारांचे खरे वारसदार मानतात, त्यांनी ही उदारता दाखवायला हवी. एकनाथ शिंदे यांनी भाजपला स्पष्ट सांगावे की, केंद्रात आणि राज्यात जरी आपण मित्र असलो तरी, मुंबईत बाळासाहेबांच्या वारशासाठी आम्ही उद्धव ठाकरेंच्या उमेदवाराला पाठिंबा देऊ. मुंबई महापालिकेत सध्या सत्तेचे समीकरण पाहिले तर महायुतीकडे स्पष्ट बहुमत आहे. मात्र, ठाकरे गटाने मराठी अस्मिता आणि बाळासाहेबांचे स्वप्न या मुद्द्यांना हात घालत शिंदे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या आवाहनाला काय प्रतिसाद देतात आणि मुंबईच्या महापालिकेत कोणती नवीन समीकरणे आकाराला येतात, हे पाहावे लागेल.

याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुंबईत मनसेचा पाठिंबा घेणार का, असा थेट प्रश्न विचारण्यात आला. त्यावर शिंदे यांनी "जर आणि तरवर चर्चा न करता सध्याच्या वास्तवावर बोला" असे उत्तर देत तर्क-वितर्कांना फारसे महत्त्व देण्यास नकार दिला. तसेच मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबईमध्ये महायुतीचाच महापौर होईल, असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कल्याण-डोंबिवलीप्रमाणेच मुंबईतही ठाकरे बंधूंची युती निवडणुकीत होती. मात्र कल्याण-डोंबिवलीत मनसेने घेतलेल्या भूमिकेमुळे आता मुंबईतही तशीच पुनरावृत्ती होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## कठुआत चकमकीत जैशाचा कमांडर ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यातील बिल्लावार परिसरात सुरक्षा दलांनी केलेल्या संयुक्त कारवाईत जैश-ए-मोहम्मदचा एक दहशतवादी ठार झाला. जम्मू रेंजचे पोलिस महानिरीक्षक भीम सेन तुती यांनी ही माहिती दिली. गुप्त माहितीनुसार बिल्लावारच्या घनदाट जंगलात दहशतवादी लपल्याचे समजताच जम्मू आणि काश्मीर पोलिस, लष्कर आणि सीआरपीएफने संयुक्तपणे सापळा रचला. दहशतवाद्यांचे पळून जाण्याचे मार्ग बंद करून जंगलाला चारही बाजूंनी वेढा घालण्यात आला.

कारवाईदरम्यान दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला, त्याला सुरक्षा दलांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. या चकमकीत जैश-ए-मोहम्मदचा कमांडर उस्मान ठार झाला. घटनास्थळावरून एम-४ ऑटोमॅटिक रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२४ मध्ये उस्मान इतर दहा दहशतवाद्यांसह जम्मू परिसरात घुसखोरी करून आला होता. या गटात फरमान, पाशा, आदिल आणि सैफुल्लाह यांचाही समावेश होता. या कारवाईमुळे परिसरातील दहशतवादी हालचालींना मोठा धक्का बसल्याचे सुरक्षा दलांनी स्पष्ट केले आहे.

## अहिल्यानगरच्या सीता शेळके पुरस्काराने सन्मानित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात शौर्य आणि तांत्रिक कौशल्याचा सुयोग्य वापर करणा-या अहिल्यानगरच्या सुकन्या लेफ्टनंट कर्नल सीता अशोक शेळके यांना भारत सरकारचा मानाचा 'सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून (पराक्रम दिवस) केंद्र सरकारने ही घोषणा केली. देशभरातून आलेल्या २७१ नामांकनांतून ले. कर्नल शेळके यांची वैयक्तिक श्रेणीसाठी निवड झाली आहे. लेफ्टनंट कर्नल सीता शेळके यांनी २०२४ मध्ये केरळमधील वायनाड येथे झालेल्या भीषण भूस्खलनादरम्यान बजावलेली कामगिरी या पुरस्कारासाठी निर्णायक ठरली. वायनाडमध्ये निसर्गाचे थैमान सुरू होते, तेव्हा त्यांनी अत्यंत प्रतिकूल हवामानात शेकडो नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी बचाव मोहिमेचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्याचा सर्वात मोठा टप्पा म्हणजे चूरलमाला येथील १९० फूट लांबीच्या बेली ब्रिजची विक्रमी वेळेत केलेली उभारणी. या पुलामुळे संपर्क तुटलेल्या दुर्गम गावांशी पुन्हा संवाद प्रस्थापित झाला आणि मदतकार्य पोहोचवणे शक्य झाले.

## फुटीरतावादी खलिस्तानी गट व पाकिस्तानी आयएसआय अस्वस्थ

# प्रजासत्ताक दिनात युरोपीय महासंघाचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाला आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रथमच युरोपियन महासंघ या समन्वित संघटनेचा अधिकृत सहभाग कर्तव्य मार्गावरील परेडमध्ये होणार असून, युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि विदेशातील फुटीरतावादी खलिस्तानी गटात अस्वस्थता पसरल्याचे गुप्तचर सूत्रांकडून सांगितले जात आहे.



कर्तव्य मार्गावरील परेडमध्ये युरोपियन महासंघाचे ध्वजवाहक पथक सहभागी होणार असून, ही उपस्थिती औपचारिक नसून भारताच्या सार्वभौमत्वाला मिळालेला जागतिक पाठिंबा आणि भारत–युरोपमधील वाढता धोरणात्मक विश्वास दर्शवणारी असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, युरोपियन देशांनी अलिकडच्या काळात फुटीरतावादी संघटनांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार, अनेक तथाकथित खलिस्तानी संघटनांचे हिंसक दहशतवादी नेटवर्कशी संबंध असल्याचे पुरावे युरोपियन देशांसमोर सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे या संघटनांकडे केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या चौकटीत न पाहता, अंतर्गत सुरक्षेसाठी संभाव्य धोका म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. युरोपियन नेतृत्वाची प्रजासत्ताक दिनातील उपस्थिती म्हणजे भारताशी धोरणात्मक भागीदारीला प्राधान्य देण्याचा स्पष्ट संकेत असल्याचे मानले जात आहे.

प्रजासत्ताक दिनानंतर होणारी १६ वी भारत–युरोपीय महासंघ शिखर परिषदही तितकीच निर्णायक ठरणार आहे. मुक्त व्यापार करार, संरक्षण सहकार्य, सायबर व सागरी सुरक्षा आणि दहशतवादविरोधी समन्वय या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. भारत–युरोपीय महासंघ मुक्त व्यापार करार अंतिम टप्प्यात असल्याचे संकेत यापूर्वीच देण्यात आले असून, त्याच्या अंमलबजावणीमुळे सुमारे दोन अब्ज लोकसंख्येची आणि जागतिक जीडीपीच्या सुमारे २५ टक्के वाटा असलेली बाजारपेठ आकारास येऊ शकते.

या पार्श्वभूमीवर, प्रजासत्ताक दिनाच्या आधी क्रोएशियाची राजधानी झाग्रेब येथील भारतीय दूतावासाची झालेली तोडफोडही गांभीर्याने घेतली जात आहे. भारतीय तपास संस्थांनी केलेल्या चौकशीत पंजाबमधील दहशतवादी मॉड्यूल्सना परदेशातून निधी, हवाला आणि डिजिटल माध्यमांतून मदत दिली जात असल्याचे समोर आले आहे. हे पुरावे संबंधित परदेशी सरकारांशी शेअर करण्यात आले असून, त्यावर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले जाते.

## छगन भुजबळांना ईडीकडूनही क्लीनचिट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) छगन भुजबळ यांना महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. दीर्घकाळ सुरू असलेल्या या प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्यांच्यावरील आरोप मागे घेतले असून, भुजबळ आता या प्रकरणातून पूर्णपणे निर्दोष मुक्त झाले आहेत. यापूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागानेही (एसीबी) पुराव्याअभावी त्यांना दोषमुक्त केले होते.

दिल्लीतील महाराष्ट्र सदन इमारतीच्या बांधकामात सुमारे ८५० कोटी रुपयांची आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप भुजबळ यांच्यावर होता. या कथित घोटाळ्यामुळे त्यांना





जवळपास दोन वर्षे कारागृहात राहावे लागले होते. एकूण १४ जण या प्रकरणात आरोपी होते. मात्र प्रदीर्घ तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतर मुख्य गुन्हाच सिद्ध न झाल्याचे स्पष्ट झाले.

एसीबीकडून क्लीनचिट मिळाल्यानंतर, त्याच आधारे ईडीनेही न्यायालयात दाखल केलेला खटला मागे घेतला. भुजबळ आणि सहआरोपींनी दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी करत न्यायालयाने ईडीचा खटला रद्दबातल ठरवला आणि त्यांची निर्दोष मुक्तता केली.

या निर्णयामुळे अजित पवार गटाला राजकीयदृष्ट्या मोठा दिलासा मिळाला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचाराच्या आरोपांवर उत्तर देण्यासाठी सत्ताधारी महायुतीकडे आता एक महत्त्वाचा मुद्दा उपलब्ध झाला आहे.

दिल्लीतील महाराष्ट्र सदन बांधकामात तब्बल ८५० कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचा गंभीर आरोप छगन भुजबळ यांच्यावर करण्यात आला होता. या प्रकरणात केवळ राजकीय चर्चाच झाली नाही, तर भुजबळांना दोन वर्षे तुरुंगातही राहावे लागले होते.

त्यांच्यासह एकूण १४ जणांची नावे या कथित घोटाळ्यात गुंतलेली होती. मात्र, प्रदीर्घ कायदेशीर प्रक्रियेनंतर आता त्यांच्यावरील सर्व आरोपांना पूर्णविराम मिळाला आहे.

काही काळापूर्वीच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुराव्याअभावी भुजबळांना दोषमुक्त केले होते. मुख्य गुन्हाच सिद्ध न झाल्याने ईडीनेही आता त्यांच्या निर्दोष मुक्ततेचा अर्ज मंजूर केला आहे. या क्लिनचीटमुळे भुजबळ आता कायदेशीर कचाट्यातून पूर्णपणे बाहेर आले आहेत.

### केजरीवाल यांची निर्दोष सुटका

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे प्रमुख आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयाने दिलासा दिला. ईडीने बजावलेल्या समन्सकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करणे आणि चौकशीला हजेरी न लावल्याच्या आरोपातून न्यायालयाने केजरीवालांची निर्दोष सुटका केली आहे. दिल्ली मद्य घोटाळ्याशी निगडीत चौकशीसाठी ईडीने केजरीवाल यांना सहा वेळा समन्स बजावले होते. केवळ चौकशीला उपस्थिती लावली नाही म्हणजे जाणीवपूर्वक अनादर केला, असे म्हणता येत नाही असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना आरोपातून निर्दोष मुक्त केले.

## पंतप्रधान मोदींकडून इतिहासाची मोडतोड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेसने शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर तीव्र हल्ला चढवला. पक्षाने म्हटले आहे की, पंतप्रधान इतिहासाची मोडतोड आणि विकृतीकरण करण्यात सर्वात तज्ञ आहेत. गेल्या महिन्यात संसदेत वंदे मातरमवरील चर्चेदरम्यान राष्ट्रगीताचा इतिहास विकृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि रवींद्रनाथ टागोरांचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, असा आरोप काँग्रकडून करण्यात आला आहे.

काँग्रेसचे संपर्क प्रभारी आणि सरचिटणीस जयराम रमेश यांनी आरोप केला आहे की, पंतप्रधान मोदी पद्धतशीरपणे महात्मा गांधींच्या स्मृती आणि वारसा पुसून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या महिन्यात संसदेत राष्ट्रगीतावरील चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि त्यांचे सहकारी उघडे पडले. राष्ट्रगीताचा इतिहास विकृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा अपमान करण्याचा प्रयत्न करण्यात आला. २३ जानेवारी रोजी, देश नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२९ वी जयंती साजरी करत आहे. त्यांनी १९३७ मध्ये वंदे मातरमच्या ओळींवरील वाद सोडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान, वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त चर्चा झाली. या चर्चेमुळे सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांमध्ये जोरदार वादविवाद झाला. प्रियांका गांधी यांनी आरोप केला की बंगालच्या निवडणुका वंदे मातरमला एक विशेष विषय बनवत आहेत. काँग्रेसने भाजपवर वंदे मातरमच्या नावाखाली राजकारण खेळण्याचा आणि इतिहास पुन्हा लिहिण्याचा प्रयत्न करण्याचा आरोप केला. प्रत्युत्तरात, सत्ताधारी पक्षाने काँग्रेसवर तुष्टीकरणाचे राजकारण करण्याचा आरोप केला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पणतू आणि इतिहासकार सुगत बोस यांनी लिहिले आहे की, नेताजींनी २ नोव्हेंबर १९४२ रोजी बर्लिनमध्ये फ्री इंडिया सेंटरचे उद्घाटन केले होते आणि त्या काळात त्यांनी राष्ट्रगीताच्या वेळी जन गण मन गायले होते. नेताजींनी स्वतः ६ जुलै १९४४ रोजी सिंगापूरहून प्रसारित झालेल्या संदेशात महात्मा गांधींना राष्ट्रपिता म्हणून संबोधले होते. आता पंतप्रधान महात्मा गांधींच्या स्मृती आणि वारसा पुसून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचे नवीनतम उदाहरण म्हणजे मनरेगा कायदा मागे घेणे, हे आहे, असे जयराम म्हणाले.

## भारतीय हवाई दलाचे भव्य विशेष प्रदर्शन

# प्रजासत्ताक दिनी 'ऑपरेशन सिंदूर'ची झलक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय हवाई दल प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात 'ऑपरेशन सिंदूर' नावाच्या विशेष उड्डाण पथकाचे भव्य प्रदर्शन करणार आहे. पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्यासाठी मे महिन्यात राबवण्यात आलेल्या लष्करी कारवाईत सहभागी झालेली सर्व प्रमुख लढाऊ विमाने या पथकात सहभागी असतील.

'ऑपरेशन सिंदूर' फॉर्मेशनद्वारे हवाई शक्ती, अचूकता आणि समन्वयाचे दर्शन घडवले जाणार असून,



हे "अचूक, अभेद्य आणि सातत्यपूर्ण" या भारतीय हवाई दलाच्या संकल्पनेचे प्रतीक असेल. मोहिमेच्या यशाला दृश्यमान श्रद्धांजली म्हणून या विशेष फ्लायपास्टचे आयोजन करण्यात आले आहे, असे हवाई दलाने स्पष्ट केले.

माध्यमांशी बोलताना विंग कमांडर राजेश देशवाल यांनी सांगितले की, या वर्षीच्या फ्लायपास्टमध्ये तीन प्रमुख फॉर्मेशन्स सादर केली जाणार आहेत. गरुड, प्रहार आणि सिंदूर ही ती फॉर्मेशन्स असून, एकूण २९ विमाने या उड्डाणात सहभागी असतील. यामध्ये १६ लढाऊ विमाने, चार वाहतूक विमाने आणि नऊ हेलिकॉप्टरचा समावेश आहे. सिंदूर, ध्वज, प्रहार, गरुड, अर्जन, वरुण आणि वज्रंग अशा विविध रचनांचे प्रदर्शन केले जाणार आहे. ७ ते १० मे दरम्यान पाकिस्तानविरोधात राबवण्यात आलेल्या त्रि-सेवा लष्करी मोहिमेच्या स्मरणार्थ 'ऑपरेशन सिंदूर'चा ध्वज देखील या फ्लायपास्टमध्ये झळकणार आहेत.

या हवाई प्रदर्शनात अॅडव्हान्स्ड लाइट हेलिकॉप्टर, अपाचे अटॅक हेलिकॉप्टर, भारतीय नौदलाचे पी-८आय सागरी पाळत विमान, एमआय-१७ हेलिकॉप्टर तसेच विविध वाहतूक विमाने सहभागी होणार आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले होते.

या वर्षी प्रजासत्ताक दिनाशी संबंधित सर्व प्रमुख समारंभांची जबाबदारी भारतीय हवाई दलाकडे देण्यात आली आहे. परेडमध्ये एलिट मार्चिंग तुकड्या, क्षेपणास्त्रे, स्वदेशी शस्त्रप्रणाली आणि आधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचे प्रदर्शन होणार आहे.

युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

२६ जानेवारी रोजी कर्तव्य पथावर १७ राज्ये व केंद्रशासित प्रदेश आणि विविध मंत्रालये, विभाग व सेवांचे १३ असे एकूण ३० चित्ररथ सादर होणार आहेत. 'स्वातंत्र्य का मंत्र: वंदे मातरम्' आणि 'समृद्धी का मंत्र: आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांवर आधारित हे चित्ररथ वंदे मातरमच्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ देशाची प्रगती आणि सांस्कृतिक वैविध्य अधोरेखित करतील. ब्रह्मोस, आकाश प्रणाली, ड्रोन, हेलिकॉप्टर, मार्चिंग दलांसह भैरव बटालियनचेही औपचारिक पदार्पण होणार आहे.

## सहर शेखला पोलिसांची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा परिसर पूर्णपणे हिरवा रंगवणार अशी टिप्पणी केल्याप्रकरणी एआयएमआयएमच्या नवनिर्वाचित नगरसेवक सहर शेख यांना पोलिसांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता (बीएनएसएस) अंतर्गत नोटीस बजावली आहे.

ठाणे महानगरपालिका निवडणुकीत वॉर्ड क्रमांक ३० मधून विजयी झाल्यानंतर नगरसेविका सहर शेख यांनी केलेल्या भाषणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

या भाषणात त्यांनी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत पुढील पाच वर्षांत मुंब्रा पूर्णपणे हिरवा रंगवण्याचा मानस असल्याचे म्हटले होते. पुढील पाच वर्षांत मुंब्रामधील प्रत्येक उमेदवार एआयएमआयएमचा असेल, असेही त्या म्हणाल्या होत्या.

या वक्तव्यावर आक्षेप घेत भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीत या विधानांना चिथावणीखोर आणि जातीय तणाव निर्माण करणारे ठरवत कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली. मुंब्रा हे महाराष्ट्राचा भाग असून येथे अशा प्रकारची भाषणे स्वीकारली जाणार नाहीत, असेही पत्रात नमूद करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर मुंब्रा पोलिसांनी शेख यांना नोटीस बजावली.

# संपादकीय

## दाओसमधील घोषणा आणि वास्तवाचा ताळेबंद

**दाओसच्या व्यासपीठावरून महाराष्ट्रासाठी तीस लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची घोषणा झाली, तेव्हा साहजिकच राज्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास होता. अठरा देशांतून गुंतवणूक येणार, उद्योग उभे राहणार, रोजगार निर्माण होणार, आणि महाराष्ट्र पुन्हा एकदा देशाची आर्थिक इंजिन बनेल, असा आशावाद मांडला गेला. मात्र अशा वेळी वास्तवाचा आवाज ऐकणे अधिक गरजेचे असते.**



दाओस हे मुळात करारांचे नव्हे, तर करारांच्या आश्वासनांचे व्यासपीठ आहे. येथे सहमतीपत्रे होतात, हेतुपत्रांवर सह्या होतात, पण त्याचे प्रत्यक्षात रूपांतर होईलच असे नाही. महाराष्ट्राने यापूर्वीही अनेकदा हजारो कोटींच्या गुंतवणुकीच्या घोषणा केल्या आहेत. त्यातील किती प्रकल्प प्रत्यक्षात जमिनीवर उतरले, किती रोजगार निर्माण झाले आणि किती गुंतवणूक कागदावरच राहिली, याचा हिशेब कधीच जाहीरपणे मांडला जात नाही. त्यामुळे नव्या आकड्यांकडे पाहताना उत्साहापेक्षा सावधपणा अधिक आवश्यक ठरतो. तीस लाख कोटी हा आकडा भव्य आहे, पण तो समजून घ्यायचा असेल तर प्रश्न विचारावे लागतात. ही गुंतवणूक कोणत्या कालावधीत येणार आहे. पाच वर्षांत, दहा वर्षांत की अनिश्चित भविष्यात. ही गुंतवणूक थेट कारखाने, उत्पादन आणि रोजगार निर्माण करणारी आहे की फक्त भांडवली, वित्तीय आणि तंत्रज्ञान केंद्रित आहे. कारण भांडवली गुंतवणूक आकड्यांमध्ये मोठी दिसते, पण तिचा थेट फायदा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेलच असे नाही. सरकार रोजगारनिर्मितीचा उल्लेख करते, पण रोजगारांचे स्वरूप स्पष्ट करत नाही. हे रोजगार कुशल कामगारांसाठी असतील की अल्पकुशल आणि स्थानिक तरुणांसाठी. आयटी, डेटा सेंटर, ग्रीन एनर्जी यांसारखी क्षेत्रे महत्त्वाची आहेत, पण या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होण्यासाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक पातळीवरील तयारी आवश्यक असते. अन्यथा हे रोजगार बाहेरून येणाऱ्या मनुष्यबळाने भरले जातील आणि स्थानिक युवक पुन्हा अपेक्षाभंगाचे बळी ठरतील. गुंतवणुकीचा भौगोलिक नकाशाही तितकाच महत्त्वाचा आहे. आजपर्यंतचा अनुभव सांगतो की मोठी गुंतवणूक मुंबई, पुणे, नवी मुंबई, नागपूर या शहरांच्या आसपासच केंद्रीत होते. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातील मागास भागांमध्ये गुंतवणूक पोहोचते, असे चित्र क्वचितच दिसते. जर नव्या घोषणाही याच पद्धतीने शहरकेंद्री राहिल्या, तर प्रादेशिक असमतोल अधिक वाढेल. विकासाचा लाभ काही भागांपुरताच मर्यादित राहिला, तर सामाजिक असंतोष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दाओसच्या घोषणांमध्ये आणखी एक दुर्लक्षित मुद्दा म्हणजे पायाभूत सुविधा. गुंतवणूक येण्यासाठी रस्ते, वीज, पाणी, जमीन, पर्यावरणीय परवानग्या आणि प्रशासनाची कार्यक्षमता या सगळ्यांची गरज असते. महाराष्ट्रात अनेक औद्योगिक क्षेत्रांत अजूनही जमीन संपादनाचे प्रश्न, स्थानिक विरोध, पाण्याची टंचाई आणि वीजपुरवठ्याच्या अडचणी आहेत. या मूलभूत प्रश्नांवर उत्तर न देता केवळ परदेशी गुंतवणूकदारांचे स्वागत करणे म्हणजे गाडी घोड्यापुढे लावण्यासारखे आहे. परकीय गुंतवणूक महत्त्वाची आहे, पण तीच विकासाची एकमेव वाट नाही. स्थानिक लघु आणि मध्यम उद्योग, शेतकरी प्रक्रिया उद्योग, सहकारी क्षेत्र आणि स्थानिक उद्योजक यांना बळ न देता मोठ्या जागतिक कंपन्यांवर अवलंबून राहणे दीर्घकालीनदृष्ट्या धोकादायक ठरू शकते. जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर असताना, परदेशी कंपन्या पहिल्यांदा मागे हटतात, तोच प्रदेश जिथे सवलती मिळवून गुंतवणूक केली जाते. या पार्श्वभूमीवर सर्वांत महत्त्वाचा प्रश्न विश्वासाचा आहे. सरकार जेव्हा अशा भव्य घोषणा करते, तेव्हा त्यासोबत जबाबदारीही स्वीकारावी लागते. किती प्रकल्प प्रत्यक्ष सुरू झाले, किती अडले, किती रद्द झाले याची नियमित माहिती जनतेसमोर आली, तरच विश्वास टिकेल. अन्यथा दाओससारखी व्यासपीठे केवळ आकड्यांची स्पर्धा ठरतील आणि विकासाची चर्चा पुन्हा फक्त भाषणांपुरतीच मर्यादित राहील. दाओसमध्ये केलेली गुंतवणुकीची घोषणा म्हणजे महाराष्ट्रासाठी एक संधी आहे, हे नक्की. पण ती संधी यशस्वी ठरेल की ती निव्वळ कागदावरच राहिल, हे सरकारच्या पुढील पावलांवर अवलंबून. पारदर्शकता, वास्तववादी उद्दिष्टे, कालबद्ध अंमलबजावणी आणि सामाजिक समतोल यांचा अभाव राहिला, तर तीस लाख कोटींचा आकडा केवळ भाषणांत शोभेल असाच. विकासाचा कस हा घोषणांमध्ये नसून, सामान्य माणसाच्या आयुष्यात होणाऱ्या बदलांमध्ये असतो. महाराष्ट्राला आज त्या कसोटीवर उतरण्याची वेळ आलेली आहे.

# शक्ती, मूल्ये आणि हरवलेला तिसरामार्ग !

» दाओसच्या मंचावर यंदा पुन्हा एकदा जागतिक व्यवस्थेच्या अंताची आणि नव्या यथार्थाची चर्चा झाली. ट्रम्पचा राष्ट्रकेंद्री आग्रह आणि कॅर्नींचा मूल्याधिष्ठित यथार्थवाद यांच्यात खरा प्रश्न मात्र दुर्लक्षित राहिला या व्यवस्थेत बहुसंख्य देशांनी नेमके उभे राहायचे कुठे?



दाओस म्हणजे जगाच्या भवितव्याचे जाहीर मंथन. प्रत्यक्षात ते सत्ताधाऱ्यांच्या भीती, अपेक्षा आणि स्वार्थांचे प्रदर्शन असते. यंदाच्या चर्चेत डोनाल्ड ट्रम्प आणि मार्क कॅर्नी हे दोन आवाज विशेष ठळक ठरले. दोघेही परस्परविरोधी वाटले, पण दोघांचे म्हणणे एकाच वास्तवाकडे निर्देश करत होते. जागतिक व्यवस्था आता पूर्वीसारखी उरलेली नाही. फरक इतकाच की ट्रम्प त्या तुटलेल्या व्यवस्थेला स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्याचा आग्रह धरतात, तर कॅर्नी ती व्यवस्था संपल्याचे जाहीर करून नव्या चौकटीची मागणी करतात. ट्रम्पचे भाषण म्हणजे 'अमेरिका प्रथम' या तत्त्वज्ञानाचा विस्तार. मुक्त व्यापार, बहुपक्षीय संस्था, जागतिक नियम हे सगळे उपयोगी असतील, तोपर्यंतच. अन्यथा राष्ट्रहिताच्या नावाखाली त्यांना झुगारून देणे योग्य, अशी त्यांची भूमिका. यात काहीही लपलेले नाही. ट्रम्प जागतिक सहकार्याकडे नैतिक जबाबदारी म्हणून पाहत नाहीत; ते त्यांना व्यवहार वाटतो. फायदा झाला तर सहकार्य, अन्यथा दबाव, निर्बंध आणि धमक्या. ही भूमिका नवी नाही, पण ती आज अधिक उघडपणे मांडली जाते, हेच बदलले आहे. याच पार्श्वभूमीवर कॅर्नींचे वक्तव्य अधिक अस्वस्थ करणारे ठरते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की 'नियमाधारित जागतिक व्यवस्था' हा एक भ्रम होता. शक्तिशाली देशांनी नियम स्वतःसाठी मोडले आणि दुर्बल देशांना त्याच नियमांचे पालन करण्याचे उपदेश दिले. त्यामुळे आता मूल्यांची भाषा करून वास्तव झाकण्याचा काळ संपला आहे, असे त्यांचे म्हणणे. हा दृष्टिकोन प्रामाणिक वाटतो, कारण तो ढोंगी आशावाद नाकारतो. पण इथेच एक प्रश्न उभा राहतो. या नव्या यथार्थवादात नेमके जिंकणार कोण? ट्रम्पचा राष्ट्रकेंद्री व्यवहारवाद आणि कॅर्नींचा मूल्याधिष्ठित यथार्थवाद या दोन्ही भूमिका मोठ्या शक्तींना परवडणाऱ्या आहेत. अमेरिका, युरोप, कॅनडा यांच्याकडे आर्थिक ताकद, लष्करी क्षमता आणि संस्थात्मक प्रभाव आहे. पण आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका यांसारख्या प्रदेशांसाठी या दोन ध्रुवांमध्ये फारसा फरक उरत नाही. नियम असोत वा नसोत, निर्णय नेहमीच बलाढ्यांच्या बाजूने झुकतात, हा त्यांचा अनुभव आहे. दाओसच्या चर्चेत हरवलेला मुद्दा हाच आहे आणि तो म्हणजे जागतिक दक्षिणेचा आवाज. बहुसंख्य देशांना ना ट्रम्पसारखा स्वार्थी आत्मविश्वास परवडतो, ना कॅर्नींसारखा तत्त्वचिंतनात्मक यथार्थवाद. त्यांना रोजच्या जगण्याशी संबंधित प्रश्न भेडसावत आहेत. ऊर्जा, अन्नसुरक्षा, कर्ज, हवामान बदल, रोजगार. जागतिक व्यवस्था कोसळली की टिकली, यापेक्षा ती त्यांच्यासाठी काम करते की नाही, हा खरा मुद्दा आहे. आज जागतिक राजकारणात एक विचित्र विसंगती दिसते. एकीकडे बहुपक्षीय संस्थांची गरज पूर्वीपेक्षा जास्त आहे. हवामान बदल, महामारी, तंत्रज्ञान नियंत्रण यांसाठी सामूहिक निर्णय अपरिहार्य आहेत. दुसरीकडे त्या संस्थांवरचा विश्वास झपाट्याने कमी होत आहे. कारण त्या संस्था लोकशाहीपेक्षा सत्तासंतुलनाचे साधन बनल्या आहेत. ट्रम्प त्यांना उघडपणे दुर्लक्ष करतात, तर कॅर्नी त्यांची नैतिक दिवाळखोरी दाखवतात.

पण पर्याय काय, याचे ठोस उत्तर कोणी देत नाही. भारतासारख्या देशांसाठी ही स्थिती विशेष महत्त्वाची आहे. भारत ना पूर्णपणे पश्चिमी गटात बसतो, ना कोणत्याही एका शक्तीच्या छत्राखाली जाण्यास तयार आहे. 'रणनीतिक स्वायत्तता' हा शब्दप्रयोग भारतासाठी घोषवाक्य नसून गरज आहे. पण ही स्वायत्तता टिकवण्यासाठी केवळ संतुलन साधणे पुरेसे नाही. जागतिक पातळीवर नियम कसे असावेत, विकासाची व्याख्या काय असावी, आणि शक्तीचा वापर कोणत्या मर्यादेत असावा या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल. दाओसची चर्चा आपल्याला हेच शिकवते की जुन्या चौकटी कोसळत आहेत, पण नव्या चौकटी अजून आकाराला आलेल्या नाहीत. ट्रम्प आणि कॅर्नी हे त्या संक्रमणाचे दोन टोक दाखवतात.

एक टोक स्वार्थी शक्तीचे, दुसरे टोक अस्वस्थ प्रामाणिकतेचे. पण या दोहोंच्या मध्ये एक तिसरा मार्ग आहे आणि तो म्हणजे समावेशक, व्यवहार्य आणि बहुसंख्यांच्या गरजांशी जोडलेला. जागतिक व्यवस्थेचे भवितव्य ठरवणारी चर्चा दाओसच्या आलिशान सभागृहात होऊन चालणार नाही. ती चर्चा जगातील सामान्य नागरिकांच्या अनुभवांशी जोडली गेली पाहिजे. अन्यथा, 'नवा यथार्थवाद' असो वा 'राष्ट्रप्रथम' दोन्ही शेवटी जुन्याच असमानतेला नवे नाव देणारे ठरतील.

## १५ वर्षांनंतर देशात जनगणना; ३३ प्रश्नांची प्रश्नावली जाहीर; १ एप्रिलपासून पहिला टप्पा सुरू

### घर, कुटुंब, पाणी, वाहनांपासून जातीनिहाय माहितीचा समावेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिल्ली :** देशभरात तब्बल १५ वर्षांनंतर होणाऱ्या जनगणनेची अधिकृत तयारी सुरू झाली असून, भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त कार्यालयाने जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठीची प्रश्नावली प्रसिद्ध केली आहे. या टप्प्यात नागरिकांना एकूण ३३ प्रश्नांची उत्तरे द्यावी लागणार आहेत. जनगणनेचा पहिला टप्पा १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत राबवला जाणार आहे.



**२०२० मधील प्रश्नावलीत बदल; दोन प्रश्नांची वाढ**

यापूर्वी २०२० मध्ये जनगणनेसाठी ३१ प्रश्नांची अधिसूचना जारी करण्यात आली होती. मात्र, कोविड-१९ महामारीमुळे जनगणना पुढे ढकलण्यात आली होती. आता नव्याने प्रसिद्ध करण्यात आलेल्या राजपत्रित अधिसूचनेनुसार प्रश्नांची संख्या वाढवून ३३ करण्यात आली आहे.

**घर, कुटुंब आणि जीवनावश्यक सुविधांवर भर**

राजपत्रित अधिसूचनेनुसार, पहिल्या टप्प्यात घरांची यादी व घरगुती माहिती संकलित केली जाणार आहे. यामध्ये घराचे स्वरूप, कुटुंबातील सदस्यांची संख्या, वाहनांची माहिती, पिण्याच्या पाण्याचा स्रोत, घरातील फरशी व छतासाठी वापरण्यात आलेले साहित्य, विवाहित जोडप्यांची संख्या, धान्याचा वापर, कुटुंब प्रमुखाचे लिंग तसेच जीवनावश्यक वस्तूंशी संबंधित माहिती यांचा समावेश आहे. ही सर्व माहिती कुटुंब प्रमुखाने देणे अपेक्षित आहे.

**नागरिकांना स्वतः माहिती भरण्याचा पर्याय**

केंद्रीय गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेशात जनगणनेचे काम ३० दिवसांत पूर्ण केले जाईल. तसेच घरांची यादी तयार करण्यापूर्वी नागरिकांना १५ दिवस स्वतःहून माहिती भरण्याचा (Self-Enumeration) पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे.

**२०२७ ची जनगणना पूर्णपणे डिजिटल**

२०२७ मध्ये होणारी जनगणना ही पूर्णतः डिजिटल पद्धतीने पार पडणार आहे. सुमारे ३० लाख कर्मचारी मोबाईल ॲपच्या माध्यमातून माहिती संकलित करणार असून, त्यामुळे ही जनगणना पेपरलेस असेल.

## पुण्यात भरदिवसा घरफोडींचे विकृत प्रकार वाढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरात चोरी आणि घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ दिसत आहे आणि नुकतीच सकाळच्या उन्हाळ्यात सोमवार पेठेतील एका सोसायटीत भरदिवसा घरफोडीची घटना उघडकीस आली आहे, यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे.

स्थानिक रहिवासी महिलेकडून समर्थ पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, सोमवार पेठेतील खडीचे मैदान परिसरात येथील एका बंगला सोसायटीच्या सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी सुमारे 3 लाख 12 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केला. सदनिकेचे दरवाजे लॉक करून ही महिला सकाळी बाहेर गेली होती आणि दुपार पावणेतीनंतर परत आल्यावर घरफोडीचा प्रकार लक्षात आला. पोलिसांनी तत्काळ धाव घेत सीसीटीव्ही फुटेज गोळा करून तपास सुरू केला आहे.

पोलिस तपासात वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी सांगितले की, परिसरातील नागेश्वर मंदिर ते ओंदुबर मंडळ क्षेत्रातील सीसीटीव्ही तपासले जात आहेत. पोलिस उपनिरीक्षक दत्तप्रसाद शेंडगे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. फक्त घरफोडीच नव्हे तर शहराच्या इतर भागात चोरीचे प्रकारही वाढले आहेत. विश्रांतवाडी आणि खराडीतील दोन दुकानांचे कुलूप तोडून एकूण 2 लाख 49 हजार रुपयांची रोकड चोरी झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

## शेतीमाल निर्यातीत गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणुकीचा धक्कादायक प्रकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शेतीमाल निर्यात व्यवसायात आकर्षक परतावा देण्याच्या आमिषाने ठेवीदारांची तब्बल १५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या प्रकरणी समर्थ क्रॉप केअर कंपनीचे संचालक प्रशांत अनिल गवळी याला पुण्यातील आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. या घटनेची माहिती हडपसर पोलीस ठाण्यातील फिर्यादीनुसार प्राथमिक तपासात समोर आली, आणि प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने पुढील तपास विशेष पथकाकडे सोपविण्यात आला आहे.

पोलिसांच्या तपासातून समोर आले आहे की, गवळी हा ठेवीदारांना स्वतःला मानद व्यापार आयुक्त असल्याचे सांगून शेतीमाल निर्यातीत गुंतवणुकीचा दावा करून आकर्षक परतावा मिळेल असेच वचन देत होता. त्याने शेतीमाल परदेशात विक्री करण्याच्या व्यवसायाचा पोरवटा दाखवून लोकांकडून पैसा जमा केला. प्राथमिक तपासात गवळी यांनी अनेक ठेवीदारांकडून गुंतवणूक घेतल्याचे आढळून आले आहे, परंतु नंतर कायदेशीर परतावा देण्यात तो अपयशी ठरले. आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने गवळी याला अटक करत त्याच्यासह आणखी काही संभाव्य सहकारी आरोपींचा शोध घेत आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा आणि पोलिस उपायुक्त विवेक मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हायक पोलीस आयुक्त शुभदा संखे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस आणि सहायक पोलीस निरीक्षक अर्चना गायकवाड यांनी हा कारवाई केली.

## प्रजासत्ताक दिनी सर्व शाळांत सामूहिक कवायत बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



- परस्पर सुटीस सक्त मनाई देशभक्तीपर गीतांवर 20 मिनिटांचे संचलन, 100 टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट
- 4,860 शाळांत क्रीडा शिक्षकांची पदनिर्मिती

**पुणे :** राज्यातील सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी शाळांमध्ये प्रजासत्ताक दिनी (26 जानेवारी) सामूहिक कवायत संचलन राबविणे अनिवार्य करण्यात आले असून, या दिवशी कोणत्याही शाळेला परस्पर सुटी जाहीर करता येणार नाही, असा स्पष्ट आदेश शिक्षण विभागाने दिला आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांची 100 टक्के उपस्थिती सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली.

राज्य मंडळ कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी, सचिव डॉ. दीपक माळी व सहसंचालक हारून अतार उपस्थित होते. यापूर्वी स्वातंत्र्य दिनी देशभक्तिपर गीतांवर सामूहिक कवायत राबविण्यात आली होती. त्याला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर प्रजासत्ताक दिनीही हा उपक्रम सक्तीने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षण आयुक्त सिंह यांनी सांगितले की, 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम शासकीय झेंडावंदनानंतर आयोजित केला जाईल. देशभक्तिपर गीतांच्या तालावर सुमारे 20 मिनिटांचे कवायत संचलन होणार असून, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, शारीरिक तंदुरुस्ती, आरोग्यजागृती आणि संघभावना निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कवायतीसाठी विद्यार्थ्यांचा सराव 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत करून घेण्याच्या सूचना आधीच देण्यात आल्या आहेत. आवश्यकतेनुसार एनसीसी व स्काऊट-गाईडच्या विद्यार्थ्यांची मदत घेण्यासही शाळांना मुभा देण्यात आली आहे. एकाच परिसरातील प्राथमिक, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी एकत्रितपणे संचलन कार्यक्रम आयोजित करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व शासकीय व खासगी शाळांमधील सुमारे 2 कोटी 10 लाख विद्यार्थ्यांचा सहभाग या उपक्रमात अपेक्षित आहे. त्यामुळे कोणताही विद्यार्थी गैरहजर राहणार नाही, याची जबाबदारी शाळा प्रशासनावर टाकण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासासोबतच खेळ व व्यायाम महत्त्वाचा असल्याचे नमूद करत, शिक्षण आयुक्तांनी एक महत्त्वाची घोषणा केली. राज्यातील 4,860 केंद्र शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची स्वतंत्र पदनिर्मिती करण्यात आली असून, लवकरच या पदांवर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

## विद्यार्थ्यांना आर.आर.आर. सेंटर संकल्पनेचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाचा अभिनव उपक्रम; स्वच्छ सर्वेक्षण २०२६ व माझी वसुंधरा अभियानाशी संलग्न जनजागृती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** कचरा कमी वापर, पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण (Reduce, Reuse, Recycle) या तत्त्वांवर आधारित आर.आर.आर. सेंटर संकल्पनेबाबत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजाव्यात, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. चिंचवड येथील जिजाऊ पर्यटन केंद्रात आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आर.आर.आर. सेंटरची सविस्तर माहिती देण्यात आली.




या उपक्रमाअंतर्गत दैनंदिन जीवनात कचरा निर्मिती कशी कमी करता येईल, वापरलेल्या वस्तूंचा पुनर्वापर कोणत्या पद्धतीने करता येतो, तसेच पुनर्चक्रीकरणामुळे पर्यावरण संरक्षणाला कसा हातभार लागतो, याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरण रक्षणात प्रत्येक नागरिकाची जबाबदारी किती महत्त्वाची आहे, हे विद्यार्थ्यांना उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले.

पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'ब' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १७ मधील जिजाऊ पर्यटन केंद्रात स्वच्छ सर्वेक्षण २०२६ आणि माझी वसुंधरा ६.० अभियानाच्या अनुषंगाने हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

> "पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आर.आर.आर. केंद्राच्या माध्यमातून कमी वापर, पुनर्वापर आणि पुनर्चक्रीकरण या संकल्पनांच्या आधारे विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच स्वच्छतेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केला जात आहे. अशा अभिनव उपक्रमांमुळे शहर अधिक स्वच्छ, सुंदर व हरित होण्यास निश्चितच मदत होईल."
>
> —डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

कार्यक्रमादरम्यान केंद्र शासनाच्या "स्वच्छ आदत से स्वच्छ भारत" या उपक्रमाची माहिती देण्यात आली. ओला व सुका कचरा विलगीकरणाचे महत्त्व स्पष्ट करताना ओल्या कचऱ्यासाठी हिरव्या रंगाच्या डब्याचा, तर सुक्या कचऱ्यासाठी निळ्या रंगाच्या डब्याचा वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यासोबतच कचरा रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळणे, सिंगल यूज प्लास्टिकचा वापर बंद करणे, सार्वजनिक शौचालयांचा योग्य वापर करणे तसेच "फ्लश करा, हात स्वच्छ ठेवा" यासारख्या स्वच्छतेच्या मूलभूत सवयी अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्न विचारले आणि स्वच्छतेविषयी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. शालेय वयातच अशा प्रकारची प्रात्यक्षिके व मार्गदर्शन मिळाल्यास स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत दीर्घकालीन बदल घडून येतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## बदलापूर पुन्हा हादरलं!

### शाळेतून घरी परतताना स्कूल व्हॅनमध्ये चार वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बदलापूर :** बदलापूर पश्चिम परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली असून, शाळेतून घरी परतत असताना स्कूल व्हॅनमध्ये चार वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, हा किळसवाणा प्रकार चक्क शाळेच्या व्हॅन चालकानेच केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे बदलापूर शहर पुन्हा एकदा हादरले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सदर चिमुकली ही नेहमीप्रमाणे शाळेतून स्कूल व्हॅनमधून घरी परतत होती. याच दरम्यान व्हॅन चालकाने तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. घरी पोहोचल्यानंतर चिमुकलीने घडलेला सर्व प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. आरोपीने मारहाण केल्याचे तसेच त्याने केलेल्या अमानवी कृत्याची माहितीही तिने पालकांना दिली. ही बाब समजताच कुटुंबीय हादरून गेले.

**पोलिसांत गुन्हा दाखल; आरोपी अटकेत**

घटनेची माहिती मिळताच संतप्त पालकांनी तात्काळ बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करत आरोपी चालकाला अटक केली आहे. सध्या पीडित चिमुकलीची वैद्यकीय तपासणी सुरू असून पुढील कायदेशीर प्रक्रिया पोलिसांकडून राबवली जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अवसरी फाटा-निरगुडसर रस्त्याचे काम संथ

**आंबेगाव :** तालुक्याच्या पूर्व भागातील अवसरी फाटा-निरगुडसर-पारगाव मुख्य रस्त्याचे ४१८ कोटींच्या निधीतून सिमेंट काँक्रिटीकरण सुरू असले तरी काम संथगतीने सुरू आहे. गेल्या चार महिन्यांपासून सुरू असलेल्या कामामुळे ठिकठिकाणी रस्ता खोदण्यात आला असून अपघातांचा धोका वाढला आहे. दोन दिवसांपूर्वी खड्ड्याचा अंदाज न आल्याने एक कार पलटी झाली. धुळीमुळे नागरिकही त्रस्त असून संबंधित विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### पुणे ग्रामीण पोलिसांत धक्कादायक खुलासा; हवालदार ड्रग तस्कर

**पुणे :** पुणे ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई केली असून तब्बल २० कोटी रुपयांचे मेफेड्रॉन (एमडी) जप्त करण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे या रॅकेटचा मुख्य सूत्रधार अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील हवालदार शामसुंदर गुजर असल्याचे उघड झाले. गुजर आपल्या पदाचा गैरवापर करून ड्रग्सची अंतर्गत माहिती तस्करांना पुरवत महाविद्यालयीन तरुणांपर्यंत पोहोचवत होता. शिरूर पोलिसांनी माऊली शिंदे यालाही अटक केली असून, या रॅकेटचे जाळे आंतरराज्य पातळीवर असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### पोलिसांनी जप्त केली 2.65 लाखांची रक्कम

**तळेगाव ढमढेरे :** नोव्हेंबर 2023 मध्ये लोणी काळभोरातील महादेव महारुद्र कचरे (वय 57) यांना अज्ञात आरोपींनी कर्जाच्या बहाण्याने फसवले. स्वतःला फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी म्हणून दाखवून, त्यांनी तक्रारदाराकडून ऑनलाईन 2,65,000 रुपये उकळवले. फसवणूक लक्षात आल्यावर तक्रारदाराने पोलीस ठाण्यात तक्रार केली. सायबर पथकाने तांत्रिक तपास करून बँक व्यवहारांचा मागोवा घेतला आणि रक्कम जप्त करून तक्रारदारास परत केली.

## शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान; निरा कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्याची मोठी आवक

# सासवड उपबाजारात ज्वारीला विक्रमी 4,451 रुपयांचा दर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** सासवड (ता. पुरंदर) येथील निरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजारात सध्या धान्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असून, ज्वारीला मिळालेल्या विक्रमी दरामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. बुधवारी (दि. २१) सासवड उपबाजारात ज्वारीला प्रतिक्विंटल तब्बल ४,४५१ रुपयांचा विक्रमी दर मिळाल्याची माहिती निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे यांनी दिली. वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या दरामुळे परिसरातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

बुधवारी झालेल्या बाजारात ज्वारीच्या एक नंबर प्रतीला प्रतिक्विंटल किमान २,८०१ रुपये, कमाल ४,४५१ रुपये, तर सरासरी ३,६२६ रुपये दर मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सचिव मिलिंद जगताप यांनी दिली. यावर्षी ज्वारीची गुणवत्ता चांगली असल्याने तसेच व्यापाऱ्यांकडून मोठी मागणी असल्याने दरात लक्षणीय वाढ झाल्याचे बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी सासवड उपबाजारात मोठ्या प्रमाणात आवक केल्याने बाजारात चैतन्य निर्माण झाले आहे.

सासवड उपबाजारात ज्वारीसह इतर धान्यांचीही आवक वाढताना दिसत आहे. शेतकऱ्यांनी शेतमाल थेट बाजारात आणल्यामुळे त्यांना योग्य भाव मिळत असून, दलालांवरील अवलंबन कमी झाल्याचे चित्र आहे. बाजार समितीच्या माध्यमातून पारदर्शक लिलाव पद्धतीने व्यवहार होत असल्याने शेतकऱ्यांचा बाजार व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होत आहे.

या वेळी बाजार समितीचे उपसभापती बाळासाहेब शिंदे, संचालक शरद जगताप, महादेव टिळेकर, गणेश होले, वामनभाऊ कामठे, सुशांत कांबळे, पंकज निलाखे, देविदास कामठे, अनिल माने, अशोक निगडे, शरयू वाबळे, भाऊसाहेब गुलदगड, संचालिका शहजान शेख, लिपीक विकास कांबळे यांच्यासह अनेक व्यापारी व शेतकरी उपस्थित होते. व्यापाऱ्यांमध्ये आर. के. ट्रेडर्सचे रुपचंद कांडगे, आर. आर. ट्रेडर्सचे राजेंद्र जळींद्रे, सत्यवान पवार, जितेंद्र महाजन, अविनाश महाजन, नंदकुमार महाजन, शैलेश वीरकर आदींचा सहभाग होता.

+ गुळालाही चांगला भाव मिळाल्याने बाजारात उत्साह

दरम्यान, निरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुळ बाजारातही समाधानकारक व्यवहार झाले. गुळ बाजारात एकूण ३४० बॉक्स म्हणजेच सुमारे ६८ क्विंटल गुळाची आवक झाली. गुळाला किमान ३,७०० रुपये, कमाल ४,१५० रुपये, तर सरासरी ४,००० रुपये दर मिळाल्याची माहिती गुळ बाजार सहसचिव नितिन किकले, कृष्णात खलाटे आणि प्रवीण कर्णवर यांनी दिली. गुळालाही चांगला भाव मिळाल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

गेल्या काही काळात बाजारातील दर चढ-उतार अनुभवत असताना, सासवड उपबाजारात ज्वारी व गुळाला मिळालेला हा चांगला भाव शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरला आहे. पुढील काही दिवसांतही आवक वाढण्याची शक्यता असून, बाजार समितीने शेतकऱ्यांना योग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती तयारी केल्याचे प्रशासनाने सांगितले. एकूणच, सासवड उपबाजारातील हे सकारात्मक चित्र शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीला बळ देणारे ठरत आहे.

**सासवड उपबाजार : ठळक माहिती**

- ज्वारीला प्रतिक्विंटल कमाल ४,४५१ रुपये दर
- किमान दर : २,८०१ रुपये
- सरासरी दर : ३,६२६ रुपये
- सासवड उपबाजारात धान्याची मोठी आवक
- चांगल्या दर्जामुळे शेतकऱ्यांना समाधानकारक भाव
- गुळ बाजारात ३४० बॉक्स (६८ क्विंटल) आवक
- गुळाला किमान ३,७०० ते कमाल ४,१५० रुपये दर
- सरासरी दर : ४,००० रुपये

## जवळे ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम; दशक्रिया घाटावरच मृत्यू प्रमाणपत्रांचे वितरण

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत शोकाकुल कुटुंबांना मोठा दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील जवळे गावची ग्रामपंचायत ही विविध नाविन्यपूर्ण व लोकाभिमुख उपक्रमांमुळे नेहमीच चर्चेत असते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अनुषंगाने जवळे ग्रामपंचायतीने आणखी एक संवेदनशील आणि अभिनव उपक्रम राबवून ग्रामस्थांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना दशक्रियेच्या दिवशी होणाऱ्या मानसिक ताणतणावातून थोडा दिलासा मिळावा, या उद्देशाने मृत्यू प्रमाणपत्र थेट दशक्रिया घाटावरच देण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे

साधारणपणे मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्यासाठी कुटुंबीयांना ग्रामपंचायत कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. शोकाकुल अवस्थेत ही प्रक्रिया अधिकच त्रासदायक ठरते. ही बाब लक्षात घेऊन सरपंच वृषाली उत्तम शिंदे पाटील, उपसरपंच मनीषा टाव्हरे, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामपंचायत अधिकारी शीला साबळे यांनी एकत्रित निर्णय घेऊन हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या निर्णयानुसार, जवळे गावातील कोणत्याही मृत व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र दशक्रिया विधी संपन्न झाल्यानंतर त्याच ठिकाणी नातेवाइकांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.


या उपक्रमांतर्गत केरभाऊ नामदेव टाव्हरे व सखुबाई सहादू बरकडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दशक्रिया विधी पूर्ण होताच दशक्रिया घाटावरच त्यांच्या कुटुंबीयांना वितरित करण्यात आले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, शोकाकुल कुटुंबीयांनी ग्रामपंचायतीच्या या संवेदनशील निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

या अभिनव उपक्रमामुळे प्रशासन जनतेच्या अधिक जवळ जात असल्याचे चित्र स्पष्ट होत असून, गावपातळीवरून तसेच विविध स्तरांतून सरपंच वृषाली शिंदे पाटील आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे कौतुक होत आहे. समाजाभिमुख प्रशासनाचा आदर्श घालून देणारा हा उपक्रम इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरत असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. या उपक्रमाबाबत माहिती देताना माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य हरिचंद्र शिंदे पाटील तसेच दत्तात्रय लायगुडे पाटील यांनी सांगितले की, "ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणे हेच ग्रामपंचायतीचे उद्दिष्ट आहे. भविष्यातही असेच लोकहिताचे उपक्रम राबविण्यात येतील."

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत जवळे ग्रामपंचायतीने राबविलेला हा उपक्रम मानवी संवेदना जपणारा आणि लोककल्याणाचा आदर्श ठरणारा असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## चैतन्यवारी सद्गुरू पालखी सोहळ्याचे रविवारी देहूतून भव्य प्रस्थान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



+ श्री क्षेत्र देहू ते श्री क्षेत्र ओतूर असा तेराव्या वर्षाचा भक्तिमय प्रवास; वारकऱ्यांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**पिंपळवंडी :** शिवचिदंबर सेवा समिती, कांदळी-शिवचिदंबर नगर यांच्या वतीने आयोजित चैतन्यवारी सद्गुरू पालखी सोहळ्याचे रविवारी (दि. २५) श्री क्षेत्र देहू येथून भक्तिभावात प्रस्थान होणार आहे. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचे सद्गुरू बाबाजी चैतन्य महाराज यांची संजीवन समाधी श्री क्षेत्र ओतूर येथे असून, माघ शुद्ध दशमी रोजी साजऱ्या झालेल्या अनुग्रह दिनाचे औचित्य साधून या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

चिदंबर स्वरूप उमाकांत कुलकर्णी यांच्या प्रेरणेने सुरू झालेला हा पालखी सोहळा सद्गुरू ताई यांच्या मार्गदर्शनाखाली शिवचिदंबर सेवा समितीच्या वतीने संपन्न होत असून, यंदा या सोहळ्याचे तेरावे वर्ष आहे. देहू येथून निघालेला हा पालखी सोहळा वाघजाई नगर, शिरोली, पेठ, मंचर, नारायणगाव, ओझर या मार्गे बुधवार (दि. २८) रोजी श्री क्षेत्र ओतूर येथे चैतन्य महाराजांच्या समाधीस्थळी पोहोचणार आहे.

पालखी सोहळ्याच्या प्रारंभी वीणापूजन तुकोबा रायांचे वंशज व माजी अध्यक्ष ह.भ.प. रामदास महाराज मोरे, ह.भ.प. माणिक महाराज मोरे यांच्या हस्ते होणार आहे. तसेच पादुका पूजन देहू संस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे.

पालखीच्या वाटचालीदरम्यान तळ मुक्कामाच्या ठिकाणी विविध मान्यवर कीर्तनकारांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये ह.भ.प. नितीन महाराज काकडे, ह.भ.प. संतोष महाराज बढेकर, ह.भ.प. प्रसाद महाराज वाबळे यांची कीर्तने होणार असून, समारोपप्रसंगी ह.भ.प. भरत महाराज थोरात यांचे समारोपाचे कीर्तन होणार आहे. नारायणगाव मार्केट कमिटी परिसरात भव्य रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याने हा सोहळा वारकऱ्यांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

संपूर्ण पालखी सोहळा भक्ती, शिस्त आणि वारकरी परंपरेचे जतन करणारा ठरणार असून, बहुसंख्येने वारकरी बांधवांनी या चैतन्यवारी सद्गुरू पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन वारकरी संप्रदायाचे तालुकाध्यक्ष ह.भ.प. रामदास महाराज मोरे तसेच शिवचिदंबर सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## जारकरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत दैदीप्यमान यश

### खो-खोमध्ये प्रथम, आट्यापाट्यात तृतीय; विद्यार्थ्यांच्या कामगिरीने शाळेचा लौकिक वाढवला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** आंबेगाव तालुक्यात सर्वार्थाने प्रगतशील गाव म्हणून ओळख असलेल्या जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने यशवंतराव कला क्रीडा महोत्सव २०२५-२६ अंतर्गत झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. क्रीडा, कला व सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने शाळेने केलेले प्रयत्न या यशातून अधोरेखित झाले आहेत.

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये खो-खो या सांघिक खेळात शाळेच्या मुलींच्या संघाने मोठ्या गटात प्रथम क्रमांक पटकावून उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. चुरशीच्या सामन्यांतून निर्धार, संघभावना आणि शिस्तबद्ध खेळाचे उत्तम उदाहरण सादर करत या संघाने जिल्हाभर आपली छाप उमटवली. त्याचप्रमाणे आट्यापाट्या या पारंपरिक खेळातही मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवून शाळेच्या यशात भर घातली.

वैयक्तिक स्पर्धांमध्येही जारकरवाडी शाळेच्या विद्यार्थिनींनी चमकदार कामगिरी केली. तृप्ती जयराम लबडे हिने उंच उडी या प्रकारात द्वितीय क्रमांक, तर लांब उडीमध्ये तृतीय क्रमांक मिळवत आपली क्रीडाक्षमता सिद्ध केली. तिच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा परंपरेला आणखी बळ मिळाले आहे. यशवंतराव कला क्रीडा महोत्सवातील जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये शाळेने केलेली ही उत्तुंग कामगिरी विद्यार्थ्यांच्या मेहनतीसह त्यांना योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचे फलित आहे. क्रीडा प्रशिक्षणासोबतच शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना रुजविण्यावर शाळेने दिलेला भर या यशामागे महत्त्वाचा ठरला आहे.

### धामणीत बाळासाहेब ठाकरे जयंती उत्साहात साजरी

**धामणी :** धामणी (ता. आंबेगाव) येथे वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती ग्रामपंचायत समोरील पंचांच्या पारावर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माजी चेअरमन निवृत्तीशेठ मिंडे व बाजीराव भूमकर यांच्या हस्ते बाळासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सरपंच अक्षय राजे विधाटे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या निर्भीड नेतृत्वाचा, स्पष्टवक्तेपणाचा व मराठी माणसाच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षाचा उल्लेख केला. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपतालुकाप्रमुख महेश वाघ यांनी बाळासाहेबांमुळे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती आमदार, खासदार, मंत्री आणि मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचू शकली, असे सांगितले. कार्यक्रमास माजी सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानेश्वरी एक परिवारतर्फे आळंदीत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

### २४ व २५ जानेवारीला शालेय मुले संस्कारक्षम घडविणे; राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी येथे ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवारच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या शालेय मुले संस्कारक्षम घडविणे या उपक्रमाअंतर्गत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील सुमारे ३५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून, संस्कार, मूल्यशिक्षण आणि संतसाहित्य यांचा प्रसार करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शालेय जीवनातच विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार, व्यक्तिमत्त्व विकास आणि जीवनमूल्यांची जोपासना व्हावी, या उद्देशाने ओळख श्री ज्ञानेश्वरीची व ओळख श्री हरिपाठ हे उपक्रम राज्यातील विविध जिल्हे व तालुक्यांमध्ये राबविले जात आहेत. या उपक्रमात सहभागी असलेल्या सुमारे १५० हून अधिक शाळांमधील विद्यार्थी या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होत आहेत, अशी माहिती श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांनी दिली.

ही स्पर्धा आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या सभागृहासह विविध वर्गखोल्यांमध्ये पार पडणार आहे. शुक्रवार, २४ जानेवारी रोजी स्पर्धेचे उद्घाटन होणार असून, शनिवार, २५ जानेवारी रोजी अंतिम फेरी व भव्य पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. राज्यात आळंदी येथून सुरू झालेला हा उपक्रम आज अनेक जिल्ह्यांतील शाळांमध्ये यशस्वीपणे राबविला जात आहे. संतसाहित्यातून सुसंस्कृत, सुशिक्षित आणि मूल्याधिष्ठित नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत असून, शालेय मुलांद्वारे भावी पिढी घडविण्याचा हा उपक्रम पालक, शिक्षक आणि जाणकार नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात प्रशंसित होत आहे. अनेक शाळांनी स्वयंस्फूर्तीने या उपक्रमाचा स्वीकार केला असून, त्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा दोन गटांत होणार आहे.

## कर्मच माणसाचे भविष्य घडवते; श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथे गणेश जयंतीनिमित्त देवजन्म कीर्तनात समाजप्रबोधन

# आई-वडिलांची सेवा हीच खरी देशसेवा – निवृत्ती महाराज देशमुख

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** "कर्म कुणालाही चुकत नाही. त्यामुळे जीवन जगताना नेहमी चांगले कर्म करा. आई-वडिलांची मनापासून सेवा करा, त्यातूनच देशसेवा घडते. व्यसनापासून दूर राहून सकारात्मक जीवन जगा," असे आवाहन प्रसिद्ध समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी केले.

श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग (ता. आंबेगाव) येथील श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थानात गणेश जयंती उत्सवानिमित्त आयोजित देवजन्माच्या कीर्तनात ते बोलत होते. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशमुख महाराज पुढे म्हणाले की, पुणे जिल्हा ही पुण्यभूमी असून त्यातही श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग हे अर्धपीठ गणपतीमुळे राज्यभर प्रसिद्ध आहे. अशा पवित्र भूमीत आपला जन्म झाला, हे आपले भाग्य आहे. जीवनात आचार-विचार शुद्ध ठेवले, तर हातून आपोआप चांगली कामे घडतात. आई-वडिलांची सेवा, समाजसेवा आणि देशसेवा या तिन्ही गोष्टी जीवनात एकत्रितपणे आचरणात आणल्या पाहिजेत. व्यसन हे माणसाच्या अधःपतनाचे मुख्य कारण असून, युवकांनी विशेषतः त्यापासून दूर राहावे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

गणेश जयंतीनिमित्त देवस्थानात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे महापूजा, त्यानंतर विधीवत अभिषेक व आरती करण्यात आली. सकाळी हारतुरे मांडव डहाळ्याची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत अग्रभागी असलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकून घेतली. ढोल-ताशा व वाद्यवृंदाच्या गजरात संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.

देवजन्माचे कीर्तन संपन्न झाल्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. दुपारच्या सत्रात भजनाचा कार्यक्रम झाला. सायंकाळी श्रींच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत बाल वारकरी मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

अर्धपीठ गणपतीच्या दर्शनासाठी दिवसभर भाविकांची मोठी गर्दी होती. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक इच्छुक उमेदवारांनीही श्रींचे दर्शन घेतले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्था श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोखपणे करण्यात आली.

## 'आळंदीत गणेश जयंती विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** येथील अखिल भाजी मंडई मंडळ गणेश मंदिरांसह लक्षशांती श्री गणेश मंदिरात श्री गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मंगलमय उत्साहात झाले. लक्षशांती श्री गणेश मंदिरात राष्ट्रीय युवा कीर्तनकार, समाज प्रबोधनकार ह .भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांचे सुश्राव्य कीर्तन हरिनाम गजरात झाले. हजारो भाविकांनी कीर्तन सोहळ्यात श्रवण सुखाची अनुभूती घेतली. या सोहळ्याचे आयोजन लक्षशांती श्री गणेश मंदिराचे प्रमुख युवा उद्योजक सचिन येळवंडे यांनी केले होते.

येथील शांताई पार्क वडगाव रस्त्यावरील लक्षशांती श्री गणेश मंदिरात श्री गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यात सकाळी श्रीना अभिषेख, अथर्वशीर्ष पठण, श्री गणेश याग, श्रींची महाआरती, महाप्रसाद वाटप उत्साहात झाले. यावेळी हरेश तापकीर, शांताबाई येळवंडे, लक्ष्मण येळवंडे, युवा उद्योजक सचिन येळवंडे, सागर येळवंडे, संतोष येळवंडे, नगरसेविका कांचन येळवंडे, किरण येळवंडे आदी उपस्थित होते. या सोहळ्याचे आयोजन समस्त शांताई पार्क रहिवासी, मित्र परिवार, सुपर बझार परिवार, दत्तकृपा डेव्हलपर्स येळवंडे परिवार, आळंदी चऱ्होली खुर्द ग्रामस्थांचे वतीने करण्यात आले होते.

येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरातील पुरातन श्री गणेश मंदिर, शिवतेज गणेश मंदिर, अखिल भाजी मंडई मंडळ गणेश मंदिर, ज्ञानराज मित्र मंडळ गणेश मंदिर, राजे शिवछत्रपती गणेश मंदिर, टेमगिरे गणेश मंदिर, जय गणेश मंदिर, दत्तनगर श्री गणेश मंदिर आदी गणेश मंदिरात श्री गणेश जयंती सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा झाला.

## सारांश वृत्त

### कर्नाटकात २५०० कोटींचा घोटाळा?

**बेंगळुरू :** कर्नाटकच्या उत्पादन शुल्क विभागात २५०० कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप करत विरोधी पक्ष भाजपने शुक्रवारी विधानसभेत राज्य उत्पादन शुल्क मंत्री आर.बी. तिम्मापूर यांच्या राजीनाम्याची मागणी केली. विरोधी पक्षनेते आर. अशोक यांनी विधानसभेत हा मुद्दा मांडला आणि असा दावा केला की, आसाम आणि केरळसारख्या निवडणूक असलेल्या राज्यांमध्ये दारू परवान्यांद्वारे गोळा केलेली लाच निवडणूक खर्चासाठी वापरली जात आहे. त्यांनी असा आरोप केला की, नियमांचे उल्लंघन करून मद्य परवान्यांचे "लिलाव" केले जात आहेत आणि त्यातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे.

### व्यापारी बनून १५ लाखांची फसवणूक

**शहाजहानपूर (उत्तर प्रदेश) :** एका महिलेला "कॅनडास्थित व्यापारी" म्हणून ओळख करून देणाऱ्या व्यक्तीने लग्नाचा प्रस्ताव देऊन १५ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम फसवल्याचा आरोप पोलिसांनी शुक्रवारी केला. महिलेला विवाह वेबसाइटवर विशाल अग्रवाल नावाच्या व्यक्तीकडून विनंती आली होती. त्यावेळी आरोपीने स्वतःला कॅनडामधील व्यापारी असल्याचे सांगितले आणि फेब्रुवारीपर्यंत दिल्लीला स्थलांतर करण्याची योजना असल्याचे स्पष्ट केले. आरोपीने ऑनलाइन विवाहाच्या आश्वासनाखाली १५ लाख रुपयांहून अधिक रक्कम वसूल केली.

### कफ सिरप प्रकरणी मालमत्ता जप्त

**वाराणसी :** उत्तर प्रदेश पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानंतर कोडीन-आधारित कफ सिरप तस्करी प्रकरणातील प्रमुख आरोपी भोला प्रसाद यांच्या सुमारे २८.५० कोटी रुपयांच्या जंगम आणि स्थावर मालमत्तेवर जप्तीची कारवाई सुरु केली आहे. सोनभद्र शहराचे मंडळ अधिकारी रणधीर कुमार मिश्रा यांच्या देखरेखीखाली वाराणसीतील तीन वेगवेगळ्या ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

## नोव्हेंबरमध्ये दिवसात ५ लाखांपेक्षा जास्त प्रवाशांचे उड्डाण

# देशांतर्गत हवाई वाहतुकीचा विक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २३ नोव्हेंबर २०२५ रोजी भारताने एका दिवसात सर्वाधिक हवाई वाहतूक केली, जेव्हा ५,३८,२४९ प्रवाशांनी आकाशात उड्डाण केले, असे नागरी उड्डाण मंत्रालयाने सांगितले. त्या दिवशी देशभरात एकूण ३,३५६ विमानांनी उड्डाण केले.

भारताच्या वाढत्या देशांतर्गत विमान वाहतुकीचे स्पष्ट संकेत म्हणजे, गेल्या तीन वर्षांत दररोज ५ लाख विमान उड्डाणांची मर्यादा अनेक वेळा ओलांडली गेली आहे. २०२५ मध्ये नागरी विमान वाहतूक क्षेत्राच्या कामगिरीची माहिती देणाऱ्या मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, एकूण उड्डाणे मंजूर नियोजित उड्डाणांपैकी ८८.६६% आहेत. २१ ऑक्टोबर २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या



उडान - 'उडे देश का आम नागरिक' योजनेनंतर प्रवाशांची संख्या सतत वाढत आहे, असे त्यात म्हटले आहे.

नवी मुंबई, पटना, दातिया आणि सतना (मध्य प्रदेश), अमरावती, तुतीकोरिन, पूर्णिया (बिहार) आणि गुवाहाटी येथे नवीन विमानतळ आणि टर्मिनल सुविधांचे उद्घाटन करण्यात आले, ज्यामुळे देशातील विमान वाहतूक पायाभूत सुविधांना चालना मिळाली.

ते बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये प्रादेशिक कनेक्टिव्हिटी लक्षणीयरीत्या वाढवत आहेत आणि आर्थिक विकासाला गती देत आहेत, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

गुवाहाटी येथील लोकप्रिया गोपीनाथ बारदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळाची नुकतीच पूर्ण झालेली एकात्मिक नवीन टर्मिनल इमारत ही भारतातील पहिली निसर्ग-थीम असलेली विमानतळ टर्मिनल आहे. विमानतळाची रचना 'बांबू ऑर्किड्स' या थीम अंतर्गत आसामच्या जैवविविधता आणि सांस्कृतिक वारशापासून प्रेरणा घेते, असे त्यात म्हटले आहे.

डीजीसीएने २०२४ मध्ये १,६२८ कमर्शियल पायलट लायसन्स (सीपीएल) जारी केले आहेत, जे भारतीय नागरी विमान वाहतुकीच्या इतिहासातील सर्वोच्च पातळी आहे. मागील वर्षांमध्ये भारतात जारी केलेल्या सीपीएलची संख्या खालीलप्रमाणे आहे: २०१८ मध्ये ६४०, २०१९ मध्ये ७४४, २०२० मध्ये ५७८, २०२१ मध्ये ८६२, २०२२ मध्ये १,१६५, २०२३ मध्ये १,६२२ आणि २०२४ मध्ये १,३४७.

इंडिगो संकटादरम्यान प्रवाशांना फसवले जाणार नाही याची खात्री करून, मंत्रालयाने त्यांच्या नियामक अधिकारांचा वापर केला. मंत्रालय रिअल-टाइम डेटा आणि एअरलाइन्स आणि ऑनलाइन ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मशी सक्रिय समन्वय साधून भाडे पातळीचे बारकाईने निरीक्षण करत आहे. विहित नियमांमधील कोणत्याही विचलनावर व्यापक सार्वजनिक हितासाठी त्वरित सुधारणात्मक कारवाई केली जाईल, असे त्यात म्हटले आहे.

तक्रार निवारण जलद करण्यासाठी एमओसीएने कायमस्वरूपी २४x७ प्रवासी सहाय्य नियंत्रण कक्ष (पीएसीआर) देखील स्थापन केला. विमान वस्तूंमधील हितसंबंधांचे संरक्षण विधेयक, २०२५ हे १६ एप्रिल २०२५ रोजी कायदा बनले. हा कायदा भारताच्या विमान भाडेपट्टा आणि वित्तपुरवठा परिसंस्थेला जागतिक मानकांशी संरेखित करतो.

भारताच्या अपघात तपास क्षमतेला बळकटी देण्यासाठी, ९ एप्रिल रोजी उडान भवन येथील एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो येथे एक अत्याधुनिक डिजिटल फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर प्रयोगशाळा (ब्लॅक बॉक्स लॅब) सुरू करण्यात आली.

## नक्षलवादी कारवाईत २१ ठार, माओवादी अनलचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**झारखंड :** झारखंडच्या सारंडा जंगलात सीआरपीएफ आणि पोलिसांच्या संयुक्त कारवाईत २१ नक्षलवाद्यांचा मृत्यू झाला आहे. ३६ तास चाललेल्या चकमकीत गुरुवारी १५ जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली, तर शुक्रवारी आणखी सहा मृतदेह सापडले. या कारवाईत दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त बक्षीस असलेला माओवादी नेते पतिराम मांझी उर्फ अनल दा २५ सैनिकांसह वेढला गेला आणि ठार झाला.

अनल दा माओवादी लष्करी आयोगाचा प्रमुख होता आणि गेल्या काळात सारंडा वनक्षेत्रात सुरक्षा दलांवर झालेल्या मोठ्या हल्ल्यांमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये एसएसी कमांडर अनमोल उर्फ सुशांतचा समावेश आहे, ज्याच्यावर ओडिशा आणि झारखंड सरकारकडून ९० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. गुरुवारी सकाळी चाईबासा परिसरातील दुर्गम कुमडी व होंजोदिरी गावांमध्ये सुरू झालेल्या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली. ऑपरेशन दरम्यान हेलिकॉप्टर आणि ड्रोनचा वापर करून नक्षलवाद्यांचा शोध घेतला गेला. ऑपरेशन्स महानिरीक्षक मायकेल राज एस. यांनी सांगितले की, या कारवाईने माओवादी संघटनेचा कणा मोडला आहे आणि भविष्यातील हल्ल्यांवर नियंत्रण मिळण्यास मदत होईल.

झारखंडमधील सुरक्षा दलांच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे, कारण अनल दाचा मृत्यू आणि डझनभर नक्षलवाद्यांचा नाश माओवादी चळवळीला मोठा धक्का ठरला आहे.

## तिरुपरंकुंड्रम मंदिर प्रकरणी सर्वोच्च दखल

### न्यायालयाने केंद्र व राज्य सरकारकडून उत्तर मागितले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तामिळनाडूतील मदुराई येथील तिरुपरंकुंड्रम भगवान मुरुगन सुब्रमण्यम मंदिराचा ताबा पुरातत्व सर्वेक्षणाकडे द्यावा आणि मंदिरातील दीपथून म्हणजेच दगडी स्तंभावर दररोज दिवा लावण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, तामिळनाडू सरकार तसेच संबंधितांना उत्तर दाखल करण्यास सांगितले.

हिंदू धर्म परिषदेने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठाने भारत सरकार, तामिळनाडू सरकार, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि अन्य संबंधितांना नोटीस बजावली. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाला सांगण्यात आले की, मद्रास उच्च न्यायालयाने ६ जानेवारी रोजी दीपथूनवर दिवा लावण्यास परवानगी देणारा एकल न्यायाधीशांचा आदेश कायम ठेवला होता. याचिकेत भगवान मुरुगन मंदिराचा ताबा एएसआयने घ्यावा, दीपथूनवर कायमस्वरूपी दिवा प्रज्वलित ठेवावा, तसेच दरवर्षी कार्तिगाई महिन्यातील कार्तिगाई दीपोत्सवाच्या दिवशी संपूर्ण टेकडी दिव्यांनी उजळावी आणि मुरुग भक्तांना पूजा करण्याची मुभा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात मद्रास उच्च न्यायालयाने ६ जानेवारी रोजी महत्त्वाचा निकाल दिला होता. दीपथूनवर दिवा लावल्यास सार्वजनिक शांततेला बाधा निर्माण होईल, हा तामिळनाडू सरकारचा दावा न्यायालयाने फेटाळत तो हास्यास्पद असल्याचे नमूद केले होते. न्यायमूर्ती जयचंद्रन आणि न्यायमूर्ती रामकृष्णन यांच्या खंडपीठाने, दगडी स्तंभ आहे ती जागा श्री सुब्रमण्यम स्वामी मंदिराच्या हद्दीतच येते, असे स्पष्ट केले होते.

## काश्मीरमध्ये हंगामातील पहिली मोठी हिमवृष्टी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** काश्मीर खोऱ्यात शुक्रवारी मोठ्या प्रमाणावर बर्फवृष्टी झाली असून, श्रीनगर शहरातही हंगामातील पहिली हिमवृष्टी नोंदवली गेली. या अचानक बदललेल्या हवामानामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे, तर श्रीनगर विमानतळावरून २० हून अधिक विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, काश्मीरच्या मैदानी भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाची



बर्फवृष्टी झाली, तर खोऱ्याच्या वरच्या आणि उंच भागांमध्ये मध्यम ते जोरदार हिमवृष्टी झाली.

श्रीनगर शहराच्या उंच भागांमध्ये सुमारे दोन इंच बर्फ साचला असून, विमानतळ परिसरात तीन ते चार इंचांपर्यंत बर्फवृष्टी झाल्याचे सांगण्यात आले.

उत्तर काश्मीरमधील गुलमर्ग या प्रसिद्ध स्कीइंग रिसॉर्टमध्ये दोन फुटांपेक्षा अधिक बर्फवृष्टी झाली आहे. मध्य काश्मीरमधील गंदरबल जिल्ह्यातील सोनमर्ग पर्यटनस्थळी सहा इंचांहून अधिक, तर दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे सुमारे तीन इंच बर्फ साचल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. याशिवाय बडगाम, बारामुल्ला, कुपवाडा, शोपियान, पुलवामा आणि बांदीपोरा जिल्ह्यांतील अनेक भागांत मध्यम ते जोरदार हिमवृष्टी नोंदवली गेली आहे.

अनंतनाग आणि कुलगाम जिल्ह्यांत मात्र हलकी ते मध्यम बर्फवृष्टी झाली. श्रीनगरच्या मध्यवर्ती भागांसह काही ठिकाणी पावसाचाही मारा झाला. बर्फ साचल्यामुळे श्रीनगर विमानतळाची धावपट्टी वापरण्यायोग्य राहिली नाही.

परिणामी विमान वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली. हिमवृष्टी आणि पावसामुळे श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्गावरील अनेक भागांत रस्ते निसरडे झाल्याने हा महामार्ग तातडीने बंद करण्यात आला आहे.

याशिवाय, खोऱ्याला जम्मू प्रदेशाशी जोडणारा पर्यायी मुघल रोडही वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सोनमर्ग आणि झोजिला परिसरात झालेल्या जोरदार हिमवृष्टीमुळे श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गही बंद ठेवण्यात आला आहे.

## मंदिरातील पुजारी जमीनमालक नसून सेवकच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** एका महत्त्वपूर्ण निकालात गुजरात उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की मंदिरातील पुजारी हा मंदिराच्या जमिनीचा मालक नसून केवळ देवतेचा सेवक असतो. सार्वजनिक रस्त्यावर उभारलेल्या गणेश मंदिराच्या जमिनीवर मालकी हक्क सांगणाऱ्या पुजाऱ्याचे अपील न्यायालयाने फेटाळून लावले आहे.

वर्षानुवर्षे धार्मिक विधी केल्याने पुजाऱ्याला मंदिराच्या जमिनीवर कोणताही कायदेशीर अधिकार मिळत नाही, तसेच तो मंदिर हटविण्यापासून प्रशासनाला रोखू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती जे. सी. दोशी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने रमेशभाई उमाकांत शर्मा विरुद्ध आशाबेन कमलेशकुमार मोदी आणि अन्य या प्रकरणात हा निर्णय दिला.

पुजाऱ्याने मंदिर पाडण्यास प्रतिबंध आणावा आणि जमिनीवर आपला मालकी हक्क मान्य करावा, अशी मागणी केली होती. मात्र, ट्रायल कोर्ट आणि पहिल्या अपीलीय न्यायालयाने यापूर्वीच मंदिर हटविण्याचे आदेश दिले होते.

उच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, पुजारी हा जमिनीचा मालक नाही. तो देवतेच्या वतीने सेवा बजावतो आणि सेवक म्हणून त्याची उपस्थिती कधीही मालकीत रूपांतरित होऊ शकत नाही. धार्मिक सेवा ही कायदेशीर मालकीचा आधार ठरू शकत नाही, असेही न्यायालयाने ठणकावून सांगितले.

'प्रतिकूल ताबा' या संकल्पनेवर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले की, मालकी सिद्ध करण्यासाठी ताबा उघड, सातत्यपूर्ण आणि मूळ मालकाच्या विरोधात असणे आवश्यक असते. मात्र, या प्रकरणात पुजारी स्वतःच कबूल करतो की तो सर्वांच्या माहितीने आणि संमतीने पूजा करत होता. त्यामुळे त्याचा ताबा वादग्रस्त किंवा जबरदस्तीचा ठरत नाही.

## न्यायालयाचे ॲग्रीगेटर्सच्या अर्जांवर विचार करण्याचे आदेश

# कर्नाटकात बाईक टॅक्सी येणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**बेंगळुरू :** कर्नाटक उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात राज्य सरकारला टॅक्सी ॲग्रीगेटर्सनी दाखल केलेल्या अर्जांवर विचार करण्याचे निर्देश दिले आहेत. ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या ॲग्रीगेटर्सना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर कंत्राटी गाड्या आणि बाईक टॅक्सी चालविण्याच्या दृष्टीने मोटार वाहनांची वाहतूक वाहने म्हणून नोंदणी करण्याच्या अर्जांवर निर्णय घ्यावा, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

मुख्य न्यायाधीश विभू बाखरू आणि न्यायमूर्ती सी. एम. जोशी यांच्या खंडपीठाने हा आदेश देताना, मोटार वाहन कायद्याच्या कलम ७४(२) अंतर्गत प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना आवश्यक अटी घालण्याचा अधिकार असल्याचे नमूद केले. मात्र, केवळ बाईक टॅक्सी वाहतूक वाहने म्हणून काम करू शकत नाहीत, या कारणावरून नोंदणी नाकारणे कायदेशीर ठरणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा खंडपीठाने दिला.

हा निर्णय बाईक टॅक्सी वेल्फेअर असोसिएशन, ओला, उबर, रॅपिडो तसेच काही दुचाकी मालकांनी दाखल केलेल्या अपीलांवर सुनावणी करताना देण्यात आला. या अपीलांद्वारे २ एप्रिल रोजी एकल न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशाला आव्हान देण्यात आले होते. त्या आदेशानुसार, राज्य सरकारने मोटार वाहन कायद्याच्या कलम ९३ अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वे अधिसूचित केल्याशिवाय ॲग्रीगेटर्सना बाईक टॅक्सी सेवा चालविता येणार नाही, असे नमूद करण्यात आले होते. या आदेशानंतर रॅपिडोने कर्नाटकातील बाईक टॅक्सी सेवा तात्पुरत्या स्वरूपात बंद केल्या होत्या. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने एकल न्यायाधीशांचा हा आदेश रद्दबातल ठरवला. नोंदणीसाठी दाखल केलेल्या अर्जांवर विचार न करणे, हीच बाब कायदेशीरदृष्ट्या प्रश्नांकित असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. अर्जांचा विचार करून, कायद्यानुसार अटी घालून परवानगी देणे किंवा नाकारणे हा राज्य सरकारचा अधिकार असला, तरी सरसकट नकार देणे योग्य ठरणार नाही, असे खंडपीठाने नमूद केले. या प्रकरणात बाईक टॅक्सी वेल्फेअर असोसिएशनने न्यायालयापुढे गंभीर सामाजिक आणि आर्थिक परिणामांची मांडणी केली. राज्यातील सुमारे ६ लाख ५० हजार बाईक टॅक्सी चालकांपैकी जवळपास ६ लाख कुटुंबांच्या उपजीविकेवर या निर्णयाचा थेट परिणाम होईल, असा दावा करण्यात आला. मर्यादित रोजगार संधी असताना अनेक चालकांनी स्वतःची बचत गुंतवली असून, दुचाकी खरेदीसाठी कर्ज घेतले आहे. नोंदणी नाकारल्यास हे कुटुंब आर्थिक संकटात सापडतील, असा युक्तिवाद असोसिएशनतर्फे करण्यात आला.

## हिमाचल प्रदेशामध्ये पहिली मोठी बर्फवृष्टी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिमला :** हिमाचल प्रदेशातील गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेला कोरडा हंगाम अखेर मंगळवारी संपला. राज्याच्या विविध भागांत मोठ्या प्रमाणावर बर्फवृष्टी झाली असून ही या हिवाळ्यातील पहिली मोठी हिमवृष्टी ठरली आहे. याच वेळी पंजाब, हरियाणा आणि चंदीगडमध्ये झालेल्या पावसामुळे तापमानात लक्षणीय घट झाली असून संपूर्ण उत्तर भारतात थंडीची लाट वाढली आहे.



शिमला, किन्नौर, मनाली, नारकंडा, खडपाथर, कुफरी, सराहन, चोपाल, टाकलेच आणि रामपूर परिसरात नागरिक सकाळी बर्फाच्छादित वातावरणात जागे झाले. यापूर्वी बर्फवृष्टी प्रामुख्याने लाहौल स्पितीच्या उंच भागांपुरती आणि चंबाच्या काही भागांपुरती मर्यादित होती. ताज्या बर्फवृष्टीमुळे दीर्घकाळ कोरड्या हवामानामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी आणि सफरचंद उत्पादकांना दिलासा मिळाला असून पर्यटन व्यवसायालाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, रस्ते निसरडे झाल्यामुळे उंच भागातील वाहतुकीवर परिणाम झाला आहे. बर्फवृष्टीमुळे चोपाल देहा मुख्य रस्ता बंद करण्यात आला असून हवामान सुधारेपर्यंत अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वाहनचालकांनी विशेष सावधगिरी बाळगावी, असेही प्रशासनाने सांगितले. कुल्लू आणि लाहौल स्पितीच्या वरच्या भागात झालेल्या जोरदार बर्फवृष्टीमुळे रस्ते संपर्क खंडित झाला आहे. मनाली लेह महामार्ग, दारचा शिंकुला रस्ता तसेच तांडी आणि कडू नाल्यादरम्यानचे मार्ग वाहतुकीसाठी प्रभावित झाले आहेत.

## नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**धामतरी (छत्तीसगड) :** छत्तीसगडच्या धामतरी जिल्ह्यात ४७ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या नऊ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. रायपूर रेंजचे पोलिस महानिरीक्षक अमरेश मिश्रा यांनी सांगितले की, आत्मसमर्पण केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये सात महिला आहेत. सरकारच्या आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणामुळे त्यांना ही पाऊल उचलण्यास प्रेरणा मिळाली, असे त्यांनी सांगितले. नक्षलवाद नियंत्रित करण्यास याची मदत होणार आहे.

## अंदमान-निकोबारचे नाव 'आझाद हिंद' होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंतीनिमित्त अंदमान आणि निकोबार बेटांचे नाव बदलण्याचा प्रस्ताव पुन्हा चर्चेत आला आहे. माजी खासदार आणि तेलंगणा जागृतीच्या अध्यक्षा के. कविता यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून संपूर्ण अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहाचे नाव 'आझाद हिंद' करण्याची शिफारस केली आहे. नेताजी आणि आझाद हिंद फौजेच्या ऐतिहासिक योगदानाचा सन्मान व्हावा, हा या मागणीमागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

कविता यांनी पत्रात नमूद केले आहे की, १९४३ मध्ये नेताजींच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद सरकारने अंदमान आणि निकोबार बेटे ब्रिटिश वसाहतवादी राजवटीपासून मुक्त केली होती. त्यामुळे हा प्रदेश स्वातंत्र्य मिळवणारा पहिला भारतीय भूभाग ठरला होता. असे असतानाही, संपूर्ण द्वीपसमूह अद्याप वसाहतवादी काळात दिलेल्या नावाने ओळखला जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

सरकारने अलीकडच्या काळात नेताजींच्या स्मरणार्थ रॉस, नील आणि हॅवलॉक या तीन बेटांची नावे बदलली आहेत. मात्र, या पावलाचा पुढचा टप्पा म्हणून संपूर्ण द्वीपसमूहाचे नाव बदलणे आवश्यक असल्याचे कविता यांचे मत आहे. त्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करण्याचे आवाहन त्यांनी केंद्र सरकारकडे केले आहे.

## शशी थरूर हायकमांडच्या बैठकीपासून दूर

# केरळ काँग्रेसमध्ये अस्वस्थता वाढीस लागली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि खासदार शशी थरूर यांनी केरळ विधानसभा निवडणुकीच्या तयारीसंदर्भात काँग्रेस हायकमांडने बोलावलेल्या महत्त्वाच्या बैठकीला अनुपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याने पक्षात नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, कोची येथे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात राहुल गांधींशी संबंधित घडलेल्या घटनेमुळे थरूर नाराज असून, त्याच नाराजीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी या बैठकीपासून जाणीवपूर्वक अंतर ठेवले आहे.



कोची येथे झालेल्या महापंचायतीत राहुल गांधींसह काँग्रेसचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात थरूर यांना व्यासपीठावर बोलताना अचानक आपले भाषण थांबवण्यास सांगण्यात आल्याने ते अस्वस्थ झाले होते. केरळच्या एआयसीसी प्रभारी दीपा दासमुन्शी यांनी राहुल गांधींच्या भाषणापूर्वी थरूर यांना आपले भाषण आटोपण्यास सांगितले. राहुल गांधी व्यासपीठावर आल्यानंतर थरूर यांनी तत्काळ भाषण थांबवून त्यांचे स्वागत केले. मात्र, त्यानंतरही किमान सहा इतर नेत्यांना बोलण्याची संधी देण्यात आली, यामुळे थरूर यांना आपल्यावर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली.

या घटनेनंतर आणखी एक बाब थरूर यांच्या नाराजीला कारणीभूत ठरली. राहुल गांधींनी आपल्या भाषणात व्यासपीठावर उपस्थित असलेल्या अनेक नेत्यांचा उल्लेख केला, मात्र थरूर यांचे नाव घेतले नाही. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य आणि केरळमधील लोकप्रिय चेहरा असलेल्या थरूर यांच्यासाठी हा मुद्दा प्रतिष्ठेचा ठरला. पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याच्या मते, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर थरूर यांच्या लोकप्रियतेकडे दुर्लक्ष करणे पक्षाला परवडणारे नाही, अशी भावना त्यांच्या मनात होती.

कार्यक्रमस्थळ सोडण्यापूर्वी थरूर यांनी काही नेत्यांकडे आपली नाराजी व्यक्त केल्याचेही समोर आले आहे. त्यांच्या जवळच्या सूत्रांनुसार, आपले नाव मुद्दाम वगळण्यात आले, अशी ठाम भावना थरूर यांची आहे. निवडणुकीपूर्वी पक्ष त्यांच्या लोकप्रियतेचा वापर करेल आणि निवडणुका संपल्यानंतर त्यांना बाजूला केले जाईल, अशी भीती त्यांना वाटत असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर, काँग्रेस हायकमांडने बोलावलेल्या बैठकीला न जाणे हा थरूर यांचा जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय असल्याचे मानले जात आहे. केरळचे प्रभारी नेते दीपा दासमुन्शी आणि इतर काही वरिष्ठांनी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र थरूर यांनी त्यांच्या फोन कॉल्सना प्रतिसाद दिला नाही.

विशेष म्हणजे, या महिन्याच्या सुरुवातीला वायनाडमधील सुल्तान बाथेरी येथे झालेल्या दोन दिवसांच्या राज्यस्तरीय नेतृत्व शिबिरात सहभागी झाल्यानंतर थरूर आणि पक्ष नेतृत्वातील संबंध काहीसे सुधारल्याचे चित्र होते. संसदेत हिवाळी अधिवेशनादरम्यान केलेले त्यांचे प्रभावी हस्तक्षेपही पक्षाच्या नेतृत्वाला सकारात्मक वाटले होते. मात्र, कोचीतील ताज्या घटनेमुळे थरूर यांचा असा समज दृढ झाला आहे की नेतृत्व पुन्हा एकदा त्यांच्यापासून दूर जात आहे.

थरूर यांचे काँग्रेसच्या अधिकृत भूमिकेशी असलेले तणावपूर्ण नाते हे नवे नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी केलेली काही प्रशंसात्मक विधाने आणि नेहरू-गांधी कुटुंबावर केलेली सूचक टीका यामुळे यापूर्वीही पक्ष अडचणीत आला होता. भारत-पाकिस्तान संघर्षावरील त्यांच्या काही वक्तव्यांबाबत काँग्रेसने त्यांना अधिकृत इशाराही दिला होता.